# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

४ पुढारी | पुणे, शनिवार १ नोव्हेंबर २०१४




सरदार पटेल जयंतीनिमित्त आयोजित 'एकता दौड'मध्ये सहभागी झालेले महाविद्यालयातील विद्यार्थी.

# राष्ट्रीय एकता दौडला प्रतिसाद

## सरदार पटेल जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी एकता, सुरक्षितता आणि निर्भयतेचा दिलेला संदेश समाजाच्या सर्व क्षेत्रात पोहोचविण्यासाठी आणि स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव व्हावा यासाठी त्यांचा जन्मदिवस (दि. ३१) हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी सरदार पटेलांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. डी. बी. सुकाळे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. राष्ट्रीय एकात्मतेच्या शपथेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे यांनी केले.

राष्ट्रीय एकता दौड (रन फॉर द युनिटी) उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयापासून हुतात्मा राजगुरु वाड्यापर्यंत करण्यात आले होते. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक ऐक्याचा संदेश देताना 'धावूया सर्वांगीण प्रगतीसाठी, समृध्द भारताच्या ऐक्यासाठी' अशा प्रकारच्या घोषणा दिल्या.

या एकता दौडमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि क्रीडा विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख